**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे ‘स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धा २०२५’ व ‘स्वच्छ वॉर्ड स्पर्धा २०२५’ या स्पर्धांचा शुभारंभ**

स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत स्वच्छतेचा उच्चांक राखत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने पुन्हा एकदा नागरिकांच्या सहभागातून स्वच्छतेचा नवा आदर्श प्रस्थापित करण्यासाठी ‘स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धा २०२५’ व ‘स्वच्छ वार्ड स्पर्धा २०२५’याचे शुभारंभ मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा यांच्या हस्ते करण्यात आला.

स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये स्वच्छ शहराचा राष्ट्रपती पुरस्कार हा बहुमान मिळविल्यानंतर, ही कामगिरी टिकवून ठेवण्यासाठी आणि नागरिकांच्या स्वच्छतेबाबतच्या जाणीवेत वाढ करण्यासाठी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

- स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धा —

शाळा, निवासी संघटना/सोसायटी (RWA), रुग्णालये, बाजारपेठा, हॉटेल्स, शासकीय कार्यालय तसेच इतर सार्वजनिक व खाजगी संस्था यांचा सहभाग असेल. प्रत्येक घटकाचे १५० गुणांवर मूल्यांकन केले जाईल. मूल्यांकनामध्ये ओला व सुका कचरा वेगळा करणे, शून्य कचरा क्षेत्र, प्लास्टिक कचरा कमी करण्याचे उपक्रम, स्वच्छ व सुरक्षित शौचालय सुविधा, तसेच नावीन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश असेल.

- स्वच्छ वॉर्ड स्पर्धा -

महानगरपालिकेतील सर्व वार्डांचे १५०० गुणांवर मूल्यांकन केले जाईल. यामध्ये दररोज कचरा संकलन, स्रोतस्तरावर कचऱ्याचे विभाजन, रस्ते व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, भित्तिचित्रे व सौंदर्यीकरण, नागरिकांचा सहभाग, मोठ्या प्रमाणावर कचरा उत्पादक (Bulk waste generator) तसेच सतत देखरेख व शाश्वत स्वच्छतेचे निकष यांचा समावेश असेल.

स्पर्धेची सुरुवात: १५ ऑगस्ट २०२५

मूल्यांकन कालावधी: १५ सप्टेंबर २०२५ पासून

पुरस्कार वितरण सोहळा: २ ऑक्टोबर २०२५ (महात्मा गांधी जयंती)

स्वच्छ भारत मिशन २.० च्या उद्दिष्टांनुसार, ही स्पर्धा नागरिकांचा थेट सहभाग, लोकसहभाग आधारित उपक्रम, व स्वच्छतेतील नवकल्पना यांना प्रोत्साहन देईल. मिरा-भाईंदर महानगरपालिका सर्व नागरिक, सेवाभावी संस्था व संघटनांना या मोहिमेत सक्रिय सहभागासाठी आवाहन करते, जेणेकरून “स्वच्छ मिरा-भाईंदर, सुंदर मिरा-भाईंदर” हा संकल्प साकार होईल.